जे.एस.एम.कॉलेज, अलिबाग-रायगड

दिनांक : ०६/०९/२०२२.

# महत्वाची सूचना
# शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ ज्युनिअर व सिनिअर कॉलेज मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांकरीता

## केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर **(Post-Matric)** शिष्यवृत्ती योजना अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी

मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्याक समाजातील ( Minority Class) विद्यार्थ्यांकरीता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post-Matric) अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे. तरी वरील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांनी नविन (Fresh) व नूतनीकरण (Renewal) ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२२ ही आहे.

पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी National Scholarship Portal (NSP) या पोर्टल वर www.scholarship.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे संकेतस्थळ www.minorityaffairs.gov.in या संकेतस्थळाशी देखील जोडलेले आहे.

संबंधित शिष्यवृत्ती योजनेची सविस्तर माहिती National Scholarship Portal (NSP) या पोर्टलवर पहावी.

अर्जाची प्रत व सोबत आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे महाविद्यालयाच्या कार्यालयात श्री. अमित पाटील यांचेकडे जमा करावीत. अर्ज जमा करण्याकरीता कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करावे.

ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा **'विद्यार्थी सुविधा केंद्र'** (Students Facility Centre) येथे उपलब्ध आहे. सर्व विद्यार्थ्यांनी या केंद्रातूनच शिष्यवृत्तीचे फॉर्म भरावेत.

<u>किमान पात्रता व अटी</u> :

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४. नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२ लाख इतकी आहे.

पान नं.२वर पहावे....

६. एखाद्या विद्यार्थ्यांने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.
७. विद्यार्थ्यांने नजीकच्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे. सदर बॅक खाते अधार कार्डशी सलग्न केलेले पाहीजे. (Aadhar Seeded bank account) विद्यार्थ्यांला मंजूर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही त्याच्या बॅक खात्यावरच संबंधीत विभागामार्फत जमा करण्यात येणार आहे.
८. आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्यांने आपले अर्ज प्राचार्यांच्या मार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरवला जाईल.

<u>अर्जासोबत पुढील आवश्यक कागदपत्रे जोडावीत</u> :

१. शिष्यवृत्तीचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज
२. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईजचा फोटो.
३. Institution Verification फॉर्म
४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला.
५. विद्यार्थ्यांचे घोषणापत्र
६. अल्पसंख्याक असल्याचे पत्र - Self Declaration or self-attested.
७. फी भरल्याची पावती.
८. बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, आयएफसी नोंद आहे त्याची छायांकित प्रत.
९. आधार कार्डाची छायांकित प्रत
१०. कायम निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिकेची प्रत, वीज/दूरध्वनी देयकाची प्रत, पारपत्राची प्रत, निवडणूक ओळखपत्राची प्रत यापैकी कोणताही एक पुरावा सादर करावा.

योग्यवेळी अर्ज सादर न केल्यास व शिष्यवृत्ती न मिळाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

J. S. M. COLLEGE ALIBAG

PRINCIPAL
Indira Gandhi ... Arts, J. B. Sawant Science and Sau. Janakibai Dhondo Kunte Commerce College, Alibag-402 201. Dist. Raigad

डॉ. अनिल क. पाटील
प्राचार्य

**प्रत माहितीकरीता** – १. विद्यार्थी नोटीस बोर्ड २. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित ३. ग्रंथालय नोटीस बोर्ड ४. कार्यालय नोटीस बोर्ड ५. फाईल ६) जनता शिक्षण मंडळ कार्यालय अलिबाग ७) Facility Centre - Mr. Ritesh Mhatre